● गुरुवार, दि २६ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ६५ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जन्मेजहृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## 'ड्रॉईंग'च्या परिक्षार्थ्यांची गैरसोय




(छाया -किरण खानापुरे)

**जालना । प्रतिनिधी -** राज्याच्या कला संचालनालयातर्फे घेण्यात येणाऱ्या शासकीय रेखाकला ड्रॉइंग ग्रेड परीक्षा (एलिमेंटरी - इन्टरमिजिएट परीक्षा) २०२४-२५ या परिक्षेचे आयोजन दि २५ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर दरम्यान ऑफलाईन पद्धतीने करण्यात आले आहे. याचा पहिला पेपर व दुसरा पेपर बुधवार (दि २५) शहरातील परिक्षा केंद्रावर पार पडली मात्र, परिक्षा केंद्रावर झालेल्या असुविधेमुळे परिक्षार्थ्यांसह त्यांचा पालकांचा पुरता गोंधळ उडाला असून परिक्षार्थी विद्यार्थ्यांचे हाल झाल्याचे दिसून आले आहे.

शासकीय रेखाकला ड्रॉइंग ग्रेड (एलिमेंटरी - इन्टरमिजिएट परीक्षा) २०२४-२५ वस्तुचित्र व स्मरणचित्र अशा दोन विषयांची बुधवार (दि २५ ) रोजी परिक्षा होती. परिक्षा केंद्रावर असुविधेचा सामाना परिक्षार्थींना करावा लागला. परिक्षा केंद्रावर लाईटची सुविधा नव्हती, बसण्यासाठी जागा अपुरी होती. एका वर्गात तीस विद्यार्थी क्षमता असतांना त्या ठिकाणी जवळपास साठ विद्यार्थ्यांना परिक्षेसाठी बसविण्यात आले. काही विद्यार्थ्यांना तर विद्यालयाच्या प्राणांगणात बसविण्यात आले.

दरवर्षी हजारो विद्यार्थी एलिमेंटरी - इन्टरमिजिएट या परीक्षांना बसतात. दोन दिवस एलिमेंटरीच्या परीक्षेचे पेपर असतात, तर इन्टरमिजिएट परीक्षेचे दोन पेपर असतात. या परीक्षेला जाताना आवश्यक साहित्यसामग्री ज्यात ए-४ साइजच्या ड्रॉइंग पेपरपेक्षा किंचित मोठा बोर्ड किंवा कार्डबोर्ड, पेन्सिल एचबी, २बी, ४बी, ६बी, शार्पनर, सर्व साहित्य असलेला कंपास बॉक्स, १२ इंचाची पट्टी, वॉटर बॅग, पाण्यासाठी वाटी, रंग बनवण्यासाठी पांढरी प्लेट, गोल व चपटे मोठे ब्रश व लहान रबर, लहान सुती कापड किंवा स्पंज, वॉटर कलर्स, पारदर्शक व अपारदर्शक क्रेयॉन कलर यासारखे साहित्य विद्यार्थ्यांसोबत असले. असे असतांना परिक्षेला एकाच बेंचवर दोन ते तीन विद्यार्थी बसविण्यात आल्याने विद्यार्थ्यांना साहित्य ठेवण्यातही अडचणींचा सामना करावा लागला.

या परीक्षेत केवळ ड्रॉइंगच नव्हे तर रंगकाम ही करायचे असते. स्थिरचित्र, संकल्पचित्र, स्मृतिचित्रांसोबत काही प्रमाणात अक्षरलेखन आणि निसर्गचित्र करावे लागते. यात कलानिर्मितीला वाव असतो. मुक्त हस्तचित्रात तोल, प्रमाण, लय यांची समज होते. भौमितिक व यांत्रिक साधनांच्या उपयोगाने हस्तकौशल्य व दृष्टी विकसित होते. एलिमेंटरी परीक्षा उत्तीर्ण होऊनच इंटरमिजिएट परिक्षा देता येते.

शहरातील सरस्वती भूवन हायस्कुल व सीटीएमके विद्यालयात ही परिक्षा पार पडत असून या ठिकाणी होणाऱ्या असुविधेकडे प्रशासनाने लक्ष द्यावे व झालेल्या असुविधेस नेमके कोण जबाबदार आहे? अशी विचारणा करतांनाच त्यांच्यावर योग्य ती कारवाई होणे अपेक्षीत असल्याची प्रतिक्रियी पालकांनी व्यक्त केली.

## सुहास मुंढे यांची भाजपा जालना महानगर उपाध्यक्षपदी निवड

**जालना । प्रतिनिधी -** येथील भाजपाचे निष्ठावान कार्यकर्ते सुहास मुंढे यांची भारतीय जनता पक्षाच्या जालना महानगर उपाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. ही निवड माजी केंद्रीय रेल्वे व गौण खनिज राज्यमंत्री रावसाहेब दानवे व आमदार संतोष दानवे यांचा सूचने वरून करण्यात आली आहे. यासंदर्भाने



सुहास मुंढे यांना नियुक्ती पत्र देण्यात आले आहे. यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जालना महानगर अध्यक्ष लक्ष्मीकांत पांगरकर, सिद्धिविनायक मुळे, विमलताई आगलावे यांचा उपस्थिती होती. प्रसंगी नवीन महानगर उपाध्यक्ष सुहास मुंढे यांचा सत्कार भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक व पदाधिकारी यांनी केला. यावेळी सतीश जाधव, शशिकांत घुगे, ज्ञानेश्वर ढोबळे, चंपालाल भगत, योगेश लहाने, सुनील पवार, सुनील राठी, राहुल इंगोले, सुमित सुरडकर, मनोज बिडकर आदी भाजपा पदाधिकारी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

**युवा आदर्श**

**पौटगी ...**

**घटस्फोटीत नारी**
**पोटगीचा आधार**
**कायदा कृपा छत्र**
**सांभाळते घरदार**
**उदर निर्वाहासाठी**
**जरूरअसे हकदार**
**धोरणे लवचिकता**
**न्यायालयेही उदार**
**कायद्याचे गैरवापर**
**वाढूलागले प्रकार**
**अ वास्तव मागणी**
**जडू पाहतो विकार**
**वाकवावे पुरूषांना**
**जणूं चाले व्यापार**
**आर्थिक सक्षम जरी**
**मागतात धन अपार**
**चैनछोकी करायला**
**पोटगी द्या अपरंपार**
**अस्त्राचे गैर उपयोग**
**बुमरँग झाले हत्यार**
**एककल्ली स्त्रिवाद**
**मातू नये अ विचार**
**आत्मनिर्भरनारीला**
**नको वाटे अनाचार**
**निर्णयन्यायालयाचा**
**रूजवी नवा विचार**
**सबलीकरण सार्थक**
**महिला नाही लाचार**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## मराठ्यांनो खचू नका; सरकारने धोका दिला तर सत्तेत बसून आरक्षण घेऊ - मनोज जरांगे

**जालना । प्रतिनिधी -** आचारसंहिता लागेपर्यंत आपल्या मागण्या मान्य न झाल्यास मराठ्यांनी खचून जाऊ नये, सरकारने आपल्याला धोका दिला तर सत्तेत बसून आरक्षण घेऊ असे मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. उपोषणाच्या नवव्या दिवशी बुधवार (दि २५) रोजी श्री जरांगे यांनी आपले उपोषण स्थगित केले आहे. अंतरवालीतील महिला व समाज बांधवांच्या हस्ते पाणी पित जरांगे यांनी हे आंदोलन स्थगित केले. मनोज जरांगे यांच्यावर छत्रपती संभाजी नगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात येणार आहे. रुग्णालयात भेटायला येऊ नका मी पुन्हा अंतरवालीत येऊन भेटतो असे म्हणत समाजाला त्यांनी रुग्णालयात न येण्याचे आवाहनही यावेळी केले.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी गेल्या नऊ दिवसांपासुन मनोज जरांगे यांचे अंतरवाली सराटी येथे आंदोलन सुरु होते. पण या काळात त्यांची प्रकृती खालावत चालली होती. आंदोलनादरम्यान त्यांना दोनदा सलाईन लावण्यात आले होते. समाज बांधवांनी विनंती केल्यानंतर उपचार घेण्याकरीता जरांगे यांनी आंदोलन स्थगित करीत असल्याचे सांगितले.

मराठा समाजाला आरक्षण दिले नाही तर येत्या निवडणुकीत पाडा-पाडी झाल्यास त्यांना मला जबाबदार धरू नका असा इशारा त्यांनी यावेळी दिला. मराठा तरुणांनी पक्षाच्या नेत्यांच्या पोरांना मोठं करण्याच्या नादी लागू नये, राजकारण्यांच्या नादाला लागू नये, त्यांच्या मागे-पुढे न फिरता समाजासाठी काम करावे, आपली प्रगती करावी असा सल्ला त्यांनी तरुणांना दिला.

आचारसंहिता लागेपर्यंत आपल्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर मराठ्यांनी



खचून जाऊ नये, सरकारने आपल्याशी धोका केला तर सत्तेत बसून आरक्षण घेऊ, अडाणी का होईना आपले लोकं सभागृहात पाहिजे असेही ते म्हणाले. आरक्षण नाही दिले तर सत्तेत जाऊ. मला रोज मंत्र्यांचे फोन येत आहेत. अंमलबजावणी होत असेल तर या नाहीतर येऊ नका असे मी म्हणतो. मला बदनाम करतील काहीही करतील असेही जरांगे म्हणाले. मला ४-५ दिवस तरी आरामाची गरज असल्याचे सांगत रुग्णालयात भेटायला येऊ नका, पुन्हा अंतरवलीमध्ये भेटू असेही मनोज जरांगे म्हणाले.

## ... तर त्याच दिवशी उपोषकर्त्यांची भेट का घेतली नाही

### कामगार मंडळाचा वेळकाढूपणा... तक्रारीकडे दुर्लक्ष करण्याचे कारण काय?

**दीपक शेळके**

**जालना -** गेली तीन दिवसांपासून बांधकाम कामगारांच्या मागण्यांसाठी उपोषणास बसलेले उपोषणकर्त्यांना गेल्या दि. २० सप्टेंबर २४ रोजी सरकारी कामगार अधिकारी तथा जिल्हा उपकार्यकारी अधिकारी म.ई.व इ.बां.का.क.मं जालना यांच्यावतीने एक पत्र जारी करण्यात आले होते. यात उपोषणकर्ते अर्जुन कनसे यांना तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी दिनांक २३ सप्टेंबर रोजी दुपारी ४ वाजता कार्यालयात हजर राहण्याचे सांगण्यात आले होते. मात्र, सदरील पत्र हे अर्जुन कनसे यांना दिनांक २० सप्टेंबर रोजी मिळाले नसल्याचे कनसे यांनी युवा आदर्श बोलतांना सांगितले आहे.

दि २३ तारखेला दुपारी ४ वाजता कार्यालयात भेट घेण्याचे सांगण्यात आल्यानंतरही त्याच दिवशी म्हणजे दि २३ सप्टेंबर रोजीच सकाळी ११ वाजेच्या दरम्यान पासून कार्यालयासमोर उपोषणाला बसलेल्या उपोषकर्ते अर्जुन कनसे व इतर यांची भेट संबंधीत अधिकाऱ्यांनी का घेतली नाही असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो आहे. तक्रारदारांच्या तक्रारी कडे दुर्लक्ष करण्याचा हा प्रकार आहे की, वेळकाढू पणा हे न समजण्यासारखे मुळीच नाही.


अपर जिल्हादंडाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय (गृह शाखा) यांच्या संदर्भाने सरकारी कामगार अधिकारी यांनी हे पत्र काढले होते. हे पत्र जारी केले असल्याचे सदरील विभागाला कळविण्यात आले आहे. त्यामुळे केवळ कागदी घोडे नाचवत उपोषण कर्त्यांना वेठीस धरून त्यांचे उपोषण उठविण्याचा अधिकाऱ्यांचा हा नवा फंडा आहे की काय अशी शंका उपस्थित होते आहे.

उपोषकर्ते अर्जुन कनसे यांचा बुधवार (दि २५) उपोषणाचा तिसरा दिवस आहे. या दिवशी कामगार मंडळ कार्यालयातील एका कर्मचाऱ्यांने त्यांची भेट घेऊन कामगार अधिकारी हे आजारी असल्याने छत्रपती संभाजी नगर येथे रुग्णालयात उपचार घेत असून ते आल्यानंतर चर्चा करून प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन देण्याचा प्रयत्न करत दिनांक २० सप्टेंबर रोजी काढलेले पत्र बुधवार (दि २५) रोजी देण्याचा प्रयत्न केला. मात्र, यास उपोषणकर्त्यांनी घेण्यास नकार दिला. आधी तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा आणि कारवाईचे आश्वासनाशिवाय उपोषण मागे घेणार नसल्याचा पावित्रा अर्जुन कनसे व इतर यांनी घेतला आहे.

सोमवार (दि २३) पासून उपोषण सुरु असून या दिवशी सरकारी कामगार अधिकारी श्री जाधव हे कार्यालयात हजर असल्याचा दावाही उपोषणकर्त्यांनी केला आहे. जर सरकारी कामगार अधिकारी त्या दिवशी कार्यालयात हजार होते तर त्यांनी उपोषणकर्त्यांची भेट का घेतली नाही? तक्रारीत करण्यात आलेल्या मुद्द्यांमध्ये अधिकाऱ्यांना गांभीर्य दिसून आले नाही का? दि. २० सप्टेंबर रोजी काढलेले पत्र उपोष कर्त्यांना दि.२० रोजी का देण्यात आले नाही?

सरकारी कामगार अधिकारी रुग्णालयात असतांना आता प्रशासन उपोषणकर्त्यांच्या मागण्यांवर काय भुमिका घेणार? मंगळवार (दि २४) रोजी रात्रीच्या वेळी उपोषणकर्ते अर्जुन कनसे यांचा बिपी वाढल्यामुळे त्यांची तब्येत खालावली होती.

उपोषकर्ते अर्जुन कनसे व ज्ञानेश्वर राठोड यांनी बांधकाम विभागाच्या अनागोंदी कारभारावर बोट ठेवत एजंट व अधिकारी यांच्यामधील संभाषणाचे कॉल रेकार्ड तपासून त्यांचे भ्रष्टाचार उघड करण्याचे आवाहन प्रशासनाला केले आहे. सुटी असतांना जालना शहरात एजंटांमार्फत कॅम्प होत आहेत. सुटीच्या दिवशी कॅम्प देणाऱ्या अधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांच्या चौकशीचीही मागणी उपोषकर्त्यांनी केली आहे. जालना बांधकाम कामगार कार्यालयातील संपूर्ण कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याची मागणी करतांनाच कामगारांची नाव नोंदणी, अपडेट, रिनिव्हलसाठी एका स्वतंत्र कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्याची मागणीही त्यांनी


महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ

केली आहे. विशेष म्हणजे जिल्हाधिकारी यांना निवेदन दिल्यानंतरही अधिकाऱ्यांवर कारवाई होत नसल्यामुळे मुख्यमंत्री यांनी जिल्हास्तरीय कमिटीची नेमणुक करावी अशी मागणीही उपोषकर्त्यांनी केली आहे.

# संपादकीय

## सदाबहार अभिनेते

हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार, चिरतरुण आणि चॉकलेट हिरो असे ज्यांचे वर्णन केले जायचे ते जेष्ठ सिनेअभिनेते दिवंगत देव आनंद यांची आज १०१ वि जयंती. १०१ वर्षांपुर्वी अजच्याच दिवशी म्हणजे २६ सप्टेंबर १९२३ रोजी त्यांचा जन्म झाला. हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. देव आनंद यांचे मूळ नाव देवदत्त पिशोरीमल आनंद असे होते. लहानपणापासूनच त्यांना अभिनयाची आवड होती. लाहोरमधील कॉलेजमध्ये १९४२ साली त्यांनी संगीतात ग्रॅज्युएशन पूर्ण केले. तिथेच त्यांची खुशवंत सिंग व बलराज साहनी यासारख्या दिग्गज व्यक्तिमत्वाशी भेट झाली. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी काहीकाळ नोकरीही केली मात्र नोकरीत त्यांचे मन रमले नाही. लवकरच त्यांनी नोकरी सोडून चित्रपटाची वाट धरली. प्रभात कंपनीच्या हम एक है या चित्रपटातून त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. मात्र त्यानंतर त्यांचे काही चित्रपट आपटले. त्यांच्याच कंपनीचा म्हणजे नवकेतनचा अफसर हा चित्रपट देखील पडला मात्र या अपयशाने ते डगमगले नाही. अपना भी टाइम आयेगा.... असे ते त्यावेळी निर्मात्यांना म्हणत असत त्यांनी अभिनय केलेला बाजी हा चित्रपट पडद्यावर आला आणि त्यांचे हे बोल खरे ठरले. बाजी हा चित्रपट तिकीट बारीवर यशस्वी ठरला. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली या चित्रपटाने त्यांना नायक म्हणून मान्यता दिली. या चित्रपटानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. केसांचा तुरा, गुलछबू आणि देखणी चेहरेपट्टी यामुळे उठून दिसणाऱ्या व्यक्तिमत्त्वाने प्रेक्षकांच्या हृदयात स्थान मिळवले. ते प्रेक्षकांचे आवडते नायक बनले. त्यांचे सर्व चित्रपट हिट होऊ लागले. बाजी, मुनीमजी, दुष्मन, कालाबाजार, सीआयडी, पेईंग गेस्ट, गॅम्बलर , तेरे घर के सामने, काला पाणी, जाल, गाईड, तेरे घर के सामने, छुपा रुस्तम, हरे रामा हरे कृष्णा, हिरा पन्ना, देस परदेस, ज्वेल थिप, जॉनी मेरा नाम, अव्वल नंबर, स्वामी दादा असे त्यांचे सर्वच चित्रपट यशस्वी ठरले. १९५० ते १९७० असे जवळपास दोन दशके त्यांनी हिंदी चित्रपट सृष्टीवर अधिराज्य गाजवले. राज कपूर आणि दिलीप कुमार यांच्यासारख्या तगड्या नायकांसमोर त्यांनी मोठे आव्हान उभे केले. त्याकाळात या तिघांना हिंदी चित्रपट सृष्टीतील त्रिदेव असे म्हंटले जायचे कारण या तिघांनी तो काळ अक्षरशः गाजवून सोडला होता. देव आनंद आणि राज कपूर यांच्यापेक्षा देव आनंद यांचे चाहते अधिक होते विशेषतः त्या काळातील तरुणाईने त्यांना डोक्यावर घेतले होते. त्यांचा चित्रपट फर्स्ट डे फर्स्ट शो पाहण्यासाठी तरुण कॉलेज सोडून चित्रपट गृहाबाहेर रांगेत उभे असायचे. तरुण मुली तर त्यांच्यासाठी अक्षरशः वेड्या झाल्या होत्या. त्यांची एक झलक पाहण्यासाठी मुली घरातून पळून मुंबईला येत असत. त्यांच्या यशात त्यांच्या गाण्यांचा देखील खूप मोठा वाटा आहे. त्यांच्या बहुतेक चित्रपटाला सचिन देव बर्मन यांचे संगीत लाभले. सदाबहार गायक किशोर कुमार हे त्यांच्यासाठी गाणी गात. संगीतकार सचिन देव बर्मन, गायक किशोर कुमार आणि पडद्यावरील नायक देव आनंद हे त्रिकुट असे काही जमले की त्यांच्या अनेक गाण्यांनी इतिहास घडवला. तू कहा ये बता, देखो रुठो ना करो, एक घर बनाएंगे तेरे घर के सामने, दिल का भवर करे रे पुकार, गाता रहे मेरा दिल, मै जिंदगी का साथ निभाता चला गया, चुडी नही मेरा दिल दिल है दिल, फुलो का तारों का सबका कहना है, दिन ढल जाये, छोड दो आंचल जमाना क्या कहेगा यासारखी त्यांची असंख्य गाणी आजही लोकप्रिय आहेत. आजही ही गाणी आवर्जुन ऐकली जातात. देव आनंद यांनी केवळ चित्रपटात अभिनयच केला असे नव्हे तर त्यांनी काही चित्रपटांसाठी पटकथा लेखन केले तर काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले. आंधिया, हरे रामा हरे कृष्णा, हम नौजवान, अव्वल नंबर, प्यार का तराना, गँगस्टर, मै सोलह बरस की, सेन्सॉर या चित्रपटासाठी त्यांनी पटकथा लेखन केले तर हिरा पन्ना, देस परदेस, लूटमार, स्वामी दादा, सच्चे का बोलबाला, अव्वल नंबर अशा काही चित्रपटांचे दिग्दर्शनही केले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. अभिनयासाठी त्यांना अनेक फिल्मफेअर पुरस्कार तर मिळालेच पण भारत सरकार कडूनही त्यांना मानाचा पद्मभूषण पुरस्कार मिळाला. चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च पुरस्कार समजला जाणारा दादासाहेब फाळके पुरस्कारही त्यांना मिळाला. ३ डिसेंबर २०११ रोजी त्यांचे निधन झाले. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने चित्रपट रसिकांच्या मनावर मोहिनी घालणाऱ्या या सदाबहार अभिनेत्याला त्याच्या १०१ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज महाराष्ट्र दौऱ्यावर; विविध प्रकल्पांचे राष्ट्रार्पण

**नवी दिल्ली -** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी २६ सप्टेंबर रोजी पुणे जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. यावेळी प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच २२ हजार ६०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचे राष्ट्रार्पण करतील. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या पुणे मेट्रो विभागाच्या उद्घाटनामुळे पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्ण होणार आहे. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट दरम्यानच्या भूमिगत विभागाचा खर्च सुमारे १ हजार ८१० कोटी रुपये आहे. याशिवाय सुमारे २,९५० कोटी रुपये खर्चून विकसित केल्या जाणाऱ्या पुणे मेट्रो फेज-१ च्या स्वारगेट-कात्रज विस्ताराची पायाभरणीही पंतप्रधान करणार आहेत. मार्केट यार्ड, पद्मावती आणि कात्रज या तीन स्थानकांसह सुमारे ५.४६ कि. मी. चा हा दक्षिणेकडील विस्तार पूर्णपणे भूमिगत आहे. प्रधानमंत्री भिडेवाडा येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पहिल्या मुलींच्या शाळेच्या स्मारकाची पायाभरणी करतील. सुपरकंप्युटिंग तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताला स्वावलंबी बनवण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेच्या अनुषंगाने, प्रधानमंत्री तीन परम रुद्र सुपरकंप्युटर राष्ट्राला समर्पित करतील, ज्यांची किंमत सुमारे १३० कोटी रुपये आहे. अग्रगण्य वैज्ञानिक संशोधन सुलभ करण्यासाठी हे सुपरकंप्युटर पुणे, दिल्ली आणि कोलकाता येथे तैनात करण्यात आले आहेत.



जालना शहरातील कुंडलिका नदीमध्ये कदाचित पाण्याच्या शोधात असतांना ग्रे हेडेड स्वाम्पहेन या पक्षाला छायाचित्रकार किरण खानापुरे यांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केले. ग्रे हेडेड स्वाम्पहेन हा पाणकोंबडी प्रकारातील पक्षी आहे. प्रामुख्याने नदी, तळे, दलदलीच्या ठिकाणी हा पक्षी आढळून येतो. जांभळट निळ्या रंगाचा असल्याने या पक्षाला जांभळी पाणकोंबडी या नावानेही ओळखतात. विशेष करुन भारतीय उपखंडात, श्रीलंका, अंदमान निकोबार बेट या भागात हा पक्षी मोठ्या प्रमाणात समुहात आढळून येतात.

# ‘राष्ट्रीय पोषण माह’ राबविण्यात महाराष्ट्र देशात कायमच अव्वल - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

## ‘पोषण भी, पढाई भी’ राज्यस्तरीय परिसंवादाचे उदघाटन

**मुंबई -** केंद्र सरकारने प्रारंभिक बाल्यावस्था देखभाल आणि शिक्षणअंतर्गत सुरू केलेल्या ‘पोषण भी, पढाई भी’ या कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्रात झाली आहे. अंगणवाडीच्या माध्यमातून बालकांना उत्तम पोषण आहार आणि शिक्षण देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. पोषण जनजागृती संदर्भातील विविध उपक्रमात महाराष्ट्र देशात कायमच अव्वल राहिला आहे, असे प्रतिपादन महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे ‘पोषण भी, पढाई भी’ या राज्यस्तरीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महिला व बालविकास विभागाच्या केंद्रीय राज्यमंत्री सावित्री ठाकूर, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे आयुक्त कैलास पगारे, एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार, ‘एनआयपीसीडी’चे उपसंचालक रिटा पटनाईक, सहव्यवस्थापक सिद्धांत सचदेवा तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महिला व बाल विकास मंत्री तटकरे म्हणाल्या, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेला ५० वर्ष पूर्ण होत आहेत. सेवा उपलब्ध व्हाव्या यासाठी सुरुवातीच्या काळात मिळेल त्या जागेवर अंगणवाड्या सुरू करण्यात आल्या यामध्ये अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

आई - वडिलांच्या बरोबरीनेच अंगणवाडी सेविका आणि मदतनीस बालकांवर संस्कार करत असतात. महिला व बालकांना उत्तम शिक्षण आणि पोषण देण्याचे काम महिला व बालविकास विभाग करत आहे. ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये सेविका, मदतनीस यांनी महत्त्वाची सेवा बजावली आहे. अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या मानधन वाढीसंदर्भात राज्य शासनाने नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली आहे. केंद्र शासनानेही याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा अशी विनंतीही त्यांनी केंद्रीय मंत्री यांच्याकडे केली.




केंद्रीय महिला व बालविकास राज्यमंत्री श्रीमती सावित्री ठाकूर म्हणाल्या, पोषण अभियान हा देशातील ६ वर्षांखालील लहान मुले, गरोदर स्त्रिया आणि स्तनदा मातांचे पोषण सुधारण्यासाठीचा केंद्र सरकारचा महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. पोषण माह २०२४ अंतर्गत केंद्र सरकारने आतापर्यंत ७ कोटी ९३ लाख विविध उपक्रम यशस्वीरित्या आयोजित करून एकत्रित प्रयत्नांतून कुपोषणावर मात करण्यासाठी पोषण अभियानाच्या उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित केले आहे.

पोषण भी, पढाई भी या माध्यमातून ‘स्वस्थ भारत’चे स्वप्न साकार करण्यासाठी महिनाभर चालणाऱ्या या कार्यक्रमात गर्भवती आणि स्तनदा माता, सहा वर्षांखालील लहान मुले आणि किशोरवयीन मुलींवर विशेष लक्ष केंद्रित करून पोषणविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी देशभरात विविध उपक्रम राबवले जाणार आहेत.असेही केंद्रीय राज्यमंत्री ठाकूर यांनी सांगितले.

आयुक्त कैलास पगारे म्हणाले, महिला व बालकांच्या आहारासंदर्भात असलेले गैरसमज दूर व्हावे, महिलांनी बालकांच्या पोषणासाठी काय काळजी घेतली पाहिजे. यासंबंधी माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने एकात्मिक बाल विकास सेवा योजना विभागामार्फत १ ते ३० सप्टेंबर या कालावधीत विविध उपक्रम राबवून ‘पोषण माह’ साजरा करण्यात येत आहे.

हा ७ वा राष्ट्रीय पोषण माह राबविण्यात येत आहे. या अभियानात महाराष्ट्राचा पहिला क्रमांक असल्याची माहिती एकात्मिक बाल विकास योजनेचे आयुक्त कैलास पगारे यांनी दिली. दरम्यान बालमंथन या मासिकाचे आणि नवचैतन्य या अभ्यासक्रमाचे मान्यवरांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले.

# पोलिसांच्या सद्सदविवेक बुद्धीची अधोगती ?

देशातील युपी, बिहार, कलकत्ता, मणिपूर, झारखंड सारख्या अनेक राज्यात विनयभंग, रेप, खून, लूटमार, चोरी, गाडीखाली बेगुमानपणे नागरिकांना चिरडणे, जीवघेण्या धमक्या, दंगल घडवणे काही प्रमाणात सुरूच होता. गेल्या दहा वर्षात भाजप सरकारच्या काळात मात्र ह्या दुर्दवी घटनेत कमालीची वाढ झालेली दिसते. मणिपूर मध्ये स्रियांची नग्न धिंड काढून सामूहिक बलात्कार करून मारून टाकतात.भाजपच्या नेत्यांना सत्तेचा माज इतका टोकाला गेला कि,ते काहीही करू शकतात हे एक नागडे सत्य आहे.हेच अनेक हृदय हेलावून टाकणाऱ्या घटनेवरून दिसून येते.महाराष्ट्रात वाचाळवीरांचे पीक वाढत चालले आहे.त्यांच्या वागण्या बोलण्याने धमकीने जनतेत भीतीचे वातावरण निर्माण झाले त्यावर पोलीस त्यांना जनहितासाठी समज देऊ शकत नाही काय ?शासन प्रशासन हे कर भरणाऱ्या जनतेचे सेवक आहेत ह्याचे त्यांनी भान ठेवणे आवश्यक आहे.महाराष्ट्र राज्य मात्र अश्या दुर्दैवी घटनेवर अंकुश ठेवून होता.हि खरोखरच महाराष्ट्र पोलिसांसाठी अभिमानाची गोष्ट होती.



महाराष्ट्रात गेल्या काही वर्षांपासून ज्या माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटना घडत आहेत त्यावरून शंका येते कि, खरंच हा आपला शिवरायांचा सुसंकृत,उज्वल प्रतिमा व प्रतिष्ठा जपणारा महाराष्ट्र युपी,बिहारच्या वाटेवर जोमाने घोडदौड का करत आहे ? पोलीस कुठे आणि का कमी पडतात ? पोलिसांची प्रतिमा दिवसेंदिवस का डागाळत चालली आहे ? सद्रक्षणाय खलनिग्रहाय हे ब्रीदवाक्य कित्येक दशकापासून त्याची अंमलबजावणी पोलीस करत होते.जे ट्रेनिंग दिले जाते त्यातून बाहेर पडून अनेक नामवंत पोलीस अधिकाऱ्यांनी आपले कर्तव्य चोख बजावले.सत्याची कास धरताना आपले,परके असा भेद केला नाही. आता महाराष्ट्र पोलीस ट्रेनिंग सेंटर बंद करून ते ट्रेनिंग युपी बिहार मध्ये होते काय ? अशी शंका येते कारण पोलीस आपले मानवतावादी वर्तन विसरून युपीबिहार सारख्या पोलिसांप्रमाणे वागताना दिसतात गेल्या काही महिन्यात महाराष्ट्रात ज्या मन हेलावणाऱ्या घटना घडतात त्यात बदलापूरची चुमुकली मुलींवरची बलात्काराची घटना हि मानवतेला मान खाली घालणारी असून त्यानंतरही अनेक घटनांची मालिका सुरूच आहे हे पोलीस खात्याला लाजिरवाणे वाटत नाही काय ?.पोलिसांचा आदर करणारी जनता प्रसंगी पोलिसांवर दगडफेक का करते,मारहाण करण्यापर्यंत प्रसंग घडतात असे का घडते ह्याचा विचार पोलीस करणार काय ? सदर दुर्दवी घटना हि पोलीस राजकारणी,लोकप्रतिनिधी ह्याच्या घरी घडली असती,व त्यात बहीण,मुलगी,बायको,आई, जवळचे नातेवाईक बळी पडली असती तरी डोळ्यावर कातडे ओढले असते काय ? सत्तेवर असलेल्या व नसलेल्या लोकप्रतिनिधीने भर रस्त्यात कोणाचा खून केला,स्त्रीचा विनयभंग केला,गोळीबार केला,दंडुक्याने मारले दंगल भडकवण्याचे कृत्य केले पोलिसांची कॉलर पकडली,शिवीगाळ केली,तर त्याची गय करणार,सोडून देणार,लाचारासारखे मान खाली घालून त्याच्या आदेशाचे पालन करणार,कि,त्याला कायद्याचा हिसका दाखवून फटके मारून अटक करणार ? अक्षय शिंदे हा पोलिसांच्या एंकॉउंटरमध्ये मारला गेला त्याचे दुःख वाटण्याचे कारण नाही.पण ज्या पद्धतीने प्रकार घडला तो मात्र संशय निर्माण करतो. सत्य काय आहे ते जनतेसमोर येणे गरजेचे आहे.कारण म्हातारी मेल्याचे दुःख नाही पण काळ सोकावता कामा नये. राज्यात कोणतीही अप्रिय घटना घडली आणि विलंब लागला तर पोलीस नेहमी संशयाच्या भोवऱ्यात का येतात ह्याचा पोलिसांनी आपल्या अंतर्मनात डोकवूंन पहिले तर सत्य काय आहे हे त्यांच्या लक्षात येईल. सत्ताधारी चुकीचे आदेश देऊन प्रसंग दाबून टाकण्याचा प्रयत्न करीत असतील तर त्यांचा आदेश धुडकावून पोलिसांनी आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे.बढती,बदली आणि पेट्याचा हव्यास त्याला कारणीभूत असेल तर राज्यात पोलीस हे जनतेचे रक्षणकर्ते नसून भक्षणकर्ते आहेत असाच त्याचा अर्थ होतो. पोलीस आपली डागाळलेली प्रतिमा कर्तव्य भावनेने स्वच्छ करणार काय ? सगळेच पोलीस भ्रष्ट नाहीत पण जे प्रामाणिक आहेत त्यांची मात्र ससेहोलपट होते ह्याची जाणीव भ्रष्ट पोलिसांना आहे काय ? सर्व सामान्य जनता पोलिसांपासून चार हात दूरच राहते,कारण,त्यांचा पोलिसांवर विश्वास नाही तो विश्वास पोलीस पुन्हा कमावणार काय ?

**यशवंत चव्हाण सीबीडी, बेलापूर(नवी मुंबई)**

# महाविकास आघाडीकडून निवडणूक लढविण्यास ॲड. शंकर चव्हाण इच्छुक; राष्ट्रवादीचे शरदचंद्र पवार यांच्याकडे परळी विधानसभेसाठी मागणी



**परळी वैजनाथ । प्रतिनिधी -** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात अनेक राजकीय घडामोडी घडत आहेत. नेत्यांच्या गाठीभेटी, सभा, दौरे यांना वेग आला आहे. अशातच मंगळवारी बीड जिल्ह्यातील तरूण तडफदार कार्यकर्ते ड.शंकर चव्हाण यांनी राष्ट्रीय नेते खा.शरदचंद्र पवार यांची मुंबईतील निवासस्थानी भेट घेतली. ॲड.चव्हाण यांनी या भेटीत काय घडलं याबाबतची माहिती प्रसारमाध्यमांना दिली आहे. खा.पवारांच्या भेटीवेळी परळी विधानसभा मतदारसंघाचे अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली. महाविकास आघाडीकडून आपण स्वतः ही निवडणूक लढविण्यास इच्छुक आहोत. असे सांगून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षानेच ही जागा लढवावी अशी अपेक्षा व्यक्त केली. याबाबत खा.पवार साहेब हे सकारात्मक विचार करतील अशी अपेक्षा आहे असे ड.शंकर चव्हाण यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केली.

मुंबई येथे मंगळवार, दिनांक २४ सप्टेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा.शरदचंद्र पवार यांची ड.शंकर शेषेराव चव्हाण यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत ड. शंकर चव्हाण यांनी ते स्वतः परळी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहोत असे सांगितले. साहेबांनी आपल्या स्वतःच्या सातत्यपूर्ण प्रभावी कामगिरी व कार्याची दखल घ्यावी अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी पवार साहेबांनी बीड जिल्ह्यातील परळी विधानसभा मतदारसंघाचा आढावा आणि अहवाल ड. शंकर चव्हाण यांच्याकडून जाणून घेतला. याप्रसंगी चव्हाण यांनी स्वतःचा अनुभव, केलेले कार्य यांची माहिती साहेबांना दिली. आपण आदरणीय पवार साहेबांची सदिच्छा भेट घेवून त्यांचे आशिर्वाद घेतले अशी माहिती ड. शंकर चव्हाण यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली.

महाविकास आघाडीकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहोत असे सांगून याबाबत अधिक माहिती देताना सांगितले की, माझे संपूर्ण नांव ड.शंकर शेषेराव चव्हाण आहे. मी विधीज्ञ व उद्योजक आहे. माझे शिक्षण : एलएलबी, एमबीए-एचआर झाले आहे. मी जातीने मराठा आहे. मी व्यवसायाने वकील आहे. माझी स्वतःची आयटी कंपनी आहे. रिअल इस्टेट मध्ये ही आपण काम करीत आहोत. माझे गांव नांदगाव पोस्ट सुगांव, तालुका अंबाजोगाई (जिल्हा बीड) हे आहे व ते परळी विधानसभा मतदारसंघात आहे. आपण संस्थापक : इन्फोर्डेड टेक्नॉलालीज प्रा.लि., संस्थापक : दैनिक शिवजागर, (बीड, लातूर), सचिव : विश्वनाथ फाऊंडेशन, नांदगाव, संस्थापक : अपेक्स नेस्ट प्रॉपर्टीज पुणे, संस्थापक : साप्ताहिक जयवंती टाईम्स, बीड आहोत. मी यापूर्वी राजकीय क्षेत्रात कार्य करीत असताना शेतकरी कामगार पक्ष, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष म्हणून सन २०१५ ते २०१८ कार्यरत होतो. पत्रकारीता क्षेत्रात ही मला अनुभव आहे. पत्रकार म्हणून मी तालुका प्रतिनिधी : दैनिक समर्थ लोकनेता बीड (सन २०१४ पासून २०१५), तालुका प्रतिनिधी : दैनिक मराठवाडा साथी बीड (सन २०१५ पासून २०१६), सचिव : मराठी पत्रकार परिषद, मुंबई शाखा अंबाजोगाई (सन २०१४ ते २०१५), मराठवाडा विभागीय सदस्य : महाराष्ट्र पत्रकार संघ (२०१५ ते २०१६), संपादक जयवंती टाईम्स, २०१६ ते आजतागायत व संपादक शिवजागर, २०१९ ते आजतागायत चालू आहे. मला शासकीय सेवेचा अनुभव आहे. मी मा.जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर दि. ०४.०१.२०१ ते ०३.०८.२०२४ पर्यंत कनिष्ठ लिपीक म्हणून सेवा केली आहे. तर सध्या मा. जिल्हा व सत्र न्यायालय, शिवाजीनगर, पुणे मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे वकीली करीत आहे. मला २०१५-२०१९ अशी सलग पाच वर्षे राज्यस्तरीय पत्रकारीता पुरस्कार प्राप्त झाले आहेत. ज्यात भारतीय पुरस्कार विजेते संघ, शोधपत्रकारीता व सामाजिक न्याय पुरस्कार, मुंबई भांडुप येथे (सन २०१५), पद्मश्री डॉ.मणिभाई राष्ट्रसेवा ऍवार्ड २०१६ व नेहरू युवा केंद्र मंत्रालय भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने देण्यात येणारा 'पत्रकारीता पुरस्कार' लोकशाहीर आण्णाभाऊ साठे स्मारक पदमवती पुणे येथे (सन २०१६), अंबाजोगाई पत्रकार संघ (ता.अंबाजोगाई जि.बीड) दर्पण दिनानिमित्त (सन २०१७), पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल क्रांती ग्राम विकास संस्था व विश्वनायक लोकसंसद यांच्या वतीने दिला जाणारा छत्रपती शिवाजी महाराज नेशन पॉवर अवॉर्ड - (सन २०१८) आणि संपादकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून वंचित घटकांना न्याय मिळवून देण्याची अविरत कार्य केल्यामुळे दैनिक कश्मकश व दिव्य वार्ता यांच्या वतीने दर्पण दिनानिमित्त देण्यात येणारा मौलाना अबुल कलाम आझाद पुरस्कार २०१९ (सन २०१९) प्राप्त झाले आहेत. परळी विधानसभा मतदारसंघाचा मला चांगला अभ्यास आहे. मागील अनेक वर्षांपासून या मतदारसंघात माझा मोठा जनसंपर्क व मित्र, परिवार, नातेवाईक आहेत. मला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाकडून उमेदवारी मिळाली तर आपला विजय पक्का असल्याचे युवा नेते ड.शंकर चव्हाण यांनी सांगितले.

तसेच ॲड शंकर चव्हाण यांना परळी मतदारसंघात तरुणांचा फुल सपोर्ट सोशल मिडीयाच्या माध्यमातून मिळत असून, 'आमदार हवा तर चेहरा नवा' अशा स्टेटसचा धुमाकूळ पहावयास मिळत आहे. तरुण वर्गातून सकारात्मक विचार व विकासात्मक धोरण असणारे ॲड. शंकर चव्हाण असाच लोकप्रतिनिधी म्हणून परळी मतदारसंघाचा विकास करण्यासाठी हवा आहे असा उत्साहाचा सुर परळी मतदार संघातील जनतेकडून ऐकायला मिळत आहे. एकूणच परळी मतदार संघात ड. शंकर चव्हाण यांच्या नावाचीच चर्चा असून त्यांना विधानसेत पाठवण्यासाठी मतदारसंघातील जनतेची पसंती अधिक मिळत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे व परिवर्तनाची लाट सध्या पहावयास मिळत असल्याने नव्या चेहऱ्यांनाच जनता निवडुन देणार असल्याचं ठाम असल्याचं चित्र यावरुन लक्षात येते.

## मौजपुरी येथे ज्येष्ठ नागरीक आरोग्य तपासणी; मार्गदर्शन-जनजागृती शिबीर

### २५३ लाभार्थ्यांना दिला लाभ



**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील मौजपुरी येथे सामाजिक न्याय विभाग जालना, उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि मौजपुरी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि. २४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यत जेष्ठ आणि वयोवृध्द नागरीकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर व वयोश्री योजना, तीर्थ दर्शन योजना, निराधार योजनेचे विशेष मार्गदर्शन व जनजागृती शिबीर घेण्यात आले. यावेळी प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी अरुण एम., गटविकास अधिकारी संदीप पवार, सरपंच बद्रीनारायण भसांडे, उप सरपंच सत्यनाराण ढोकळे, सामाजिक कार्यकर्ते बालाजी बळप, उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष सौ. करुणा मोरे, सचिव अच्युत मोरे, रामदास गायकवाड, सचिन डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दरम्यान या आरोग्य तपासणी शिबीरात विरेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे मेडीकल ऑफिसर डॉ. सुरज राठोड, आरोग्य सेवक आर.टी. जैवाळ, आरोग्य सहाय्यक व्ही. एच. लाड, परिचारिका एस. पी. ढिल्पे यांनी वयोवृध्द व जेष्ठ नागरीकांची आरोग्य तपासणी केली, त्यानंतर शासनाच्या वयोश्री योजना, तीर्थदर्शन योजना, निराधार योजनेसाठी लागणारे वैद्यकीय प्रमाणपत्र गावातच उपलब्ध करुन देण्यात आले. तसेच आयोजन उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने वयोवृद्धांचे तीर्थदर्शन, वयोश्री योजनेचे अर्ज देखील भरुन देण्यात आले. यावेळी गावातील उपस्थितांना शासनाच्या विविध योजना समजावून सांगून त्या बाबत मार्गदर्शन करुन जनजागृती करण्यात आली.

शासनाच्या योजनेचा जास्तीत जास्त लोकांना लाभ मिळवून देणे या उद्देशाने संस्थेच्या वतीने हे विशेष शिबीर घेण्यात आले. यावेळी मौजपुरी, भिलपुरी, निरखेडा, निपाणी पोखरी, उटवद यासह विविध तांड्यातील सुमारे २५३ लाभार्थ्यांना शासकीय योजनेचे अर्ज भरण्याचा लाभ मिळवून दिला.

## सेवेमध्ये निष्काम भावना गरजेची - सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज

**जालना । प्रतिनिधी -** हरिजन सेवक संघाच्या ९२व्या स्थापना दिवसाच्या निमित्ताने आयोजित सद्भावना संमेलनामध्ये आपले पावन आशीर्वाद प्रदान करताना सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज म्हणाल्या, मानव खर्या अर्थाने तेव्हाच मानव बनतो जेव्हा तो समस्त भेदभावांच्या पलीकडे जाऊन सर्वांभूती परमात्म्याचे रूप पाहू लागतो आणि निष्काम भावनेने सर्वांची सेवा करतो.

या प्रसंगी हरिजन सेवक संघाचे अध्यक्ष डॉक्टर शंकर कुमार सान्याल व उप-प्रधान श्री.नरेश यादव यांनी सतगुरु माताजी व निरंकारी राजपिता रमितजी यांचा वस्त्र-प्रावरण व सूती दुपट्टयाद्वारे स्वागत-सत्कार केला. देशाचे राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांनी स्थापन केलेल्या या ऐतिहासिक वारसा रूपी संस्थेच्या स्थापना दिवसाचे औचित्य साधून चरख्याचे लघु स्मृति चिन्ह देखील या सेवक संघाच्या वतीने सद्गुरु माताजींना समर्पित करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये हरिजन सेवक संघाच्या विद्यार्थ्यांनी स्वागत गीत व सरस्वती वंदनाचे गायन केले तर निरंकारी इंस्टिट्यूट ऑफ म्यूजिक न्ड आर्ट (नीमा) च्या मुलांनी गांधीजींचे आवडते भजन, वैष्णव जन सह अन्य भक्तिगीतांचे सुमधुर गायनही केले. सेवक संघाचे अध्यक्ष श्री.सान्याल यांनी गांधीजी आणि कस्तूरबाजी यांच्या मार्गदर्शनाचे वर्णन करताना एका बाजुला संघाच्या उपक्रमांचा उल्लेख केला तर दुसर्या बाजुला संत निरंकारी मिशनच्या विचारधारेचे अनुपालन केल्याने वसुधैव कुटुम्बकम साकारण्याची शक्यता वर्तवून सद्गुरु माताजींना धन्यवाद दिले. त्यांनी निरंकारी मिशनकडून सामाजिक उत्थान घडवून आणण्यासाठी केल्या जाणार्या अवरित प्रयासांची मन:पूर्वक प्रशंसा केली.



यावेळी निरंकारी राजपिताजी यांनीही आपल्या आशीर्वचनातून सांगितले, की सतगुरुकडून परमात्म्याची प्राप्ती केल्यानंतर मनुष्य सर्वांचे दु:ख-वेदना स्वतःचे समजून अहंकाररहित सेवा करु लागतो. कार्यक्रमाच्या शेवटी संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशनचे सचिव, श्री.जोगिंदर सुखिजा यांनी आभार प्रकट करताना हरिजन सेवक संघाच्या भारतभरातून सहभागी झालेलया सदस्यांना व विशिष्ट अतिथिंना धन्यवाद दिले तसेच त्यांना येत्या नोव्हेंबरमध्ये करण्यात येत असलेल्या ७७व्या वार्षिक निरंकारी संत समागमाचे हार्दिक आमंत्रणही दिले.

## बदनापूर मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेसकडून रेखा तौर इच्छुक

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)कडून बदनापूर मतदार संघातून सौ. रेखा तौर ह्या इच्छूक असुन त्यांनी आपली दावेदारी घोषीत केल्यानंतर कामगारांमध्ये आंनदाचे व उत्साहाचे वातावरण बघायला मिळत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, बदनापूर विधानसभेसाठी शरदचंद्र पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून रेखा तौर इच्छुक असून पक्षाने उमेदवारी दिल्यास पूर्ण ताकदीने निवडणूक लढवू आणि बहुमानाने निवडून असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.



रेखा तौर यांनी असंघटित कामगार संघटनेच्या उपप्रदेशाध्यक्षा म्हणून काही वर्षापासून पक्ष संघटना वाढविण्यास भर दिला आहे. पक्षाच्या निर्देशानुसार त्यांनी विविध विषयांवर यशस्वी आंदोलनं केली. कामगारांचे प्रश्न सोडविले आहेत, त्यामुळेच त्यांनी बदनापूर विधानसभा मतदार संघावर आपला दावा केला आहे.

## विलास सावंत यांची सैन्य दलात निवड




**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील मौजपुरी येथील विलास नारायण सावंत यांची भारतीय सैन्य दलात नुकतीच निवड झाली.या निवडीबद्दल मौजपुरी ग्रामस्थांनी गावातून ढोल ताशाचा गजरात गुलाल उधळत भव्य मिरवणूक काढून विलास सावंत यांचा सत्कार केला.

या निवडीबद्दल त्यांचे सरपंच बद्रीनारायण भसांडे,उपसरपंच सत्यनारायण ढोकळे, माजी सरपंच निवृत्तीराव गायकवाड, माजी सरपंच सिध्दार्थ मोरे, पत्रकार अच्युत मोरे, सोपानराव मिठे, भगवान ढोकळे, भागवत बळप, सोनाभाऊ खडेकर, पंडित बळप, बळीराम गायकवाड, मधुकर काळे, बबनराव मोरे, सुरेश ढोकळे,बालाजी बळप, सुंदर गायकवाड, विठ्ठल डोंगरे, बाळाभाऊ लोकरे, रामदास गायकवाड, मनोहर डोंगरे, विष्णू गायकवाड, गणेश डोंगरे, कृष्णा सावंत, गणेश काळे, राम मुळे, निवृत्ती काळे, कैलास सावंत, पवन काळे, लक्ष्मण सावंत यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

झाडे लावा
झाडे जगवा

## ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाने घेतली मुख्यमंत्री शिंदे यांची भेट; व्यक्त केले आभार




छायाचित्र मधुसूदन दंडारे

**मुंबई -** समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती शिष्टमंडळाने मंगळवार (दि २४) रोजी मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. परशुराम आर्थिक विकास महामंडळ दिल्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. प्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांचीही भेट या शिष्टमंडळाने घेतली. महाराष्ट्र शासन व प्रशासनाचे संबंधीत विभागाचे आभार मानण्यात आले. यावेळी मनिषा कायंदे यांच्यासह समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीचे मुख्य समन्वयक उपोषणकर्ते दीपक रणनवरे, धनंजय कुलकर्णी, श्रीकांत जोशी, ईश्वर दिक्षीत, अशोक वाघ, अर्चना सुरडकर, दीपा देशपांडे, महेश भालेराव, संजय जोशी, मधुसूदन दंडारे, स्वरा जोशी, अभिषेक समुद्रे, प्रसाद जोशी यांची उपस्थिती होती.

## जेईएस महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा





**जालना । प्रतिनिधी -** जेईएस महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ महावीर सदावर्ते ,तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. प्रवीण बाफना होते, व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ राजेश सरकटे यांची उपस्थिती होती. माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. मनिषा सुतार यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी केले, राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगून, यामधून विद्यार्थीमध्ये श्रमसंस्कार, स्वावलंबीपणा, नेतृत्व विकास,सांघिक भावना, राष्ट्रीय एकात्मता आदि चे संस्कार घडतात, विद्यार्थींची व्यक्तीमत्वाची जडणघडण होते असेही डॉ. सोनवणे यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना उपप्राचार्य प्रा.प्रवीण बाफना म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनाच्या विद्यार्थीना विशेष श्रम संस्कार शिबिर मधून ग्रामीण कृषी संस्कृतीचे दर्शन होते, ग्रामस्थांच्या समस्यांचे ज्ञान होते, शेती विषयक माहिती मिळते, असेही प्रा.बाफना यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषण करताना उपप्राचार्य डॉ महावीर सदावर्ते म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजना महाविद्यालयीन विद्यार्थी- विद्यार्थीनीसाठी वरदान असून, समाज सेवा करण्याची संधी आहे, समाजची सेवा म्हणजेच ईश्वराची सेवा, असे ही डॉ सदावर्ते म्हणालेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा योगेश लहामटे यांनी तर उपस्थितांचे आभार प्रा.किशोर तापडिया यांनी मानलेत. यावेळी प्रा.आंनद कुलकर्णी, प्रा.समाधान पवार, तसेच विद्यार्थी -विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सेवक श्री.सुनील साळुंखे,श्री.सचिन जाधव, श्री.गजानन घोडके यांनी विशेष परिश्रम घेतलेत.

## मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी समृद्धी महामार्गावर मराठ्यांच रस्ता रोको आंदोलन



**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील नाव्हा गावाजवळ असलेल्या समृद्धी महामार्गावर आज बुधवार ( दि २५) रोजी दुपारी दीड वाजेच्या दरम्यान सकल मराठा समाज बांधवांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी टायर जाळून रास्ता रोको आंदोलन केले आहे, मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे दिनांक १७ सप्टेंबर २०२४ पासून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी व सग्या सोयऱ्याचा अध्यादेश लागू करावा यासाठी सहाव्यांदा आंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत त्यांच्या उपोषणाचा आजचा नववा दिवस असून त्यांची तबियत दिवसेंदिवस खालावत चालली आहे तरी त्यांच्या उपोषणाकडे व त्यांच्याकडे राज्य सरकार जाणून-बुजून दुर्लक्ष करत असल्याचे सांगत राज्यातील कोट्यवधी मराठा समाज आक्रमक होत रस्त्यावर उतरला आहे. ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन करून समाज बांधव आपला रोष व्यक्त करताना दिसून येत आहेत. समृद्धी महामार्गावर जालना तालुक्यातील नाव्हा येथे सुद्धा हा रास्ता रोको आंदोलन करण्यात आला आहे यावेळी बोलताना आंदोलकांनी म्हटले आहे की जोपर्यंत मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या सरकार मान्य करत नाही तोपर्यंत असेच आंदोलन ठिकठिकाणी सुरू राहील. यावेळी मराठा आंदोलकांची उपस्थिती होती.

## पं. दीनदयाळ उपाध्याय व स्व. अण्णासाहेब पाटील यांची भाजपा जिल्हा कार्यालयात जयंती साजरी

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनसंघ पार्टीचे सह संस्थापक पंडित दीनदयाळ उपाध्याय व स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांची जयंती (आज २५) रोजी भारतीय जनता पार्टी जिल्हा कार्यालय जालना येथे साजरी करण्यात आली. यावेळी पंडित दीनदयाळ उपाध्याय व स्व. आमदार अण्णासाहेब पाटील यांना अभिवादन करून प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



यावेळी जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे, प्रदेश निमंत्रित सदस्य रामेश्वर भांदरगे, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, जालना महानगराध्यक्ष अशोक पांगारकर, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, विजय कामड, विमलताई आगलावे, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे आदींची प्रमुख उपस्थिती होती

यावेळी मार्गदर्शन करताना भास्कर दानवे म्हणाले की, जनसंघाचे संस्थापक डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांच्या मृत्यूनंतर ज्यांनी जनसंघाची धुरा सांभाळली व समाजातील प्रत्येक घटकाच्या उन्नतीचा विचार करून अंत्योदयाची संकल्पना मांडली आणि त्याच मार्गावर आज सन्माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या मार्गदर्शनामुळे भारतीय जनता पक्ष तळागाळात पोचला त्या दीनदयाळ उपाध्याय यांना जयंती निमित्त शतशः नमन, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे संघटन कौशल्य अंगीकृत करून व दीनदयाळ यांचे जीवन चरित्र वाचून व आपल्या जीवनात दीनदयाळ यांचे विचार आचरणात आणल्यास त्यांचे जीवन आदर्श झाल्याशिवाय राहणार नाही. त्याचबरोबर स्व. अण्णासाहेब पाटील हे सामाजिक चळवळीतील आमचे प्रेरणास्थान अखिल भारतीय मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माथाडी कामगार कायद्याचे जनक प्रखर कामगार नेते, मराठा समाजाच्या व शेतकरी कष्टकरी कामगार यांच्या प्रश्नावर मुंबईत प्रंचड मोठा मोर्चा काढल्यानंतर हि तत्कालीन राज्य शासनाने संवेदनशील दाखवला नाही म्हणून समाजासाठी आपले बलिदान देणारे नेतृत्व कै. आ. अण्णासाहेब पाटील यांच्या जयंती निमित्त त्यांच्या स्वाभिमानी पावन स्मृतीस विनम्र अभिवादन असे त्यांनी बोलतांना सांगितले. यावेळी महानगर उपाध्यक्ष धनराज काबलीये, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा संध्याताई देठे, अमोल कारंजेकर, दिपाली बिन्नीवाले, रोषण चौधरी, बबनराव सिरसाठ, जालना तालुकाध्यक्ष वसंत शिंदे, बाबुराव भवर, सुधाकर खरात, राजू गवई, सय्यद इम्रान, डोंगरसिंग साबळे, आनंद झारकंडे, सतीशचंद्र प्रभू, मुकेश चव्हाण, विकास कदम, शिवाजी गवारे, शाम जाधव, रवि कायंदे, मनोज बिडकर, अमन मित्तल, नागेश अंभोरे, सतीश अकोलकर, नीळकंठ कुलकर्णी, संतोष खंडेलवाल, कैलास पवार, गोविंद ढेंबरे, अशोक वाघ, सुदर्शन काळे, निवृत्ती लंके, भगवान चांदोडे, करण निकाळजे, राजू उगले, रोहित नलावडे, रमेश गोगडे, महेंद्र अकोले, कृष्णा इंगोले, गौरव गोधेकर, कृष्णा गायके, उद्धव ढवळे, विठ्ठल नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.